# मोडी लिपी

## एक ऐतिहासिक ठेवा...

### मोडी लिपी इतिहास

बाराव्या शतकापासून अस्तित्वात असलेल्या मोडी लिपीचे करोडो दस्तावेज आज महाराष्ट्र तसेच महाराष्ट्राबाहेर उपलब्ध आहेत. मोडी लिपीचे प्रामुख्याने बहामनी, शिवकालीन, शाहुकालीन / पेशवेकालीन आणि आंग्लकालीन असे चार प्रकारात वर्गाकरण केले जाते.

छत्रपती शिवरायांच्या कालखंडातील मोडी लिपीला शिवकालीन मोडी लिपी असे म्हटले जाते. यादवकालात सुरू झालेला मोडी लिपीचा प्रवास शिवकालात बहरुन आला. छत्रपती शाहुंच्या तसेच पेशव्यांच्या कालखंडात मोडी लिपी रेखीव, गोलाकार, तिरकस आणि सुटसुटीत लिहिली जाऊ लागली.

याकाळात मोडीचे लिखाण बोरूने होत असे. इंग्रजांच्या कालखंडात मोडी लिपी प्रामुख्याने पेनाने लिहिली जाऊ लागली. मोडी वापरायला तसेच छपाईस अवघड आहे. त्यामुळे देवनागरी (बालबोध) लिपीचा वापर ब्रिटीशांनी सक्तीचा केला. याकारणास्तव मोडी लिपीचा वापर दैनंदिन जीवनातून कमी होत गेला. मोडी लिपी सन १९६० पर्यंत लिखाणात अल्पप्रमाणात प्रचलित होती तसेच महाराष्ट्रातील प्राथमिक अभ्यासक्रमात या लिपीचा समावेश होता. मोडी लिपीतील सर्वाधिक दस्तावेज हे शाहुकालीन / पेशवेकालीन आहेत. ब्रिटीशकाळातील दस्तावेज हे प्रामुख्याने जमीनीशी संबंधीत आहेत.

मोडी दस्तावेज वाचण्यास तसेच लिहिण्यास सोयीचे व्हावे यासाठी सी-डॅकने मोडी लर्निंग ॲप, मोडी टायपिंग टूल, की-बोर्ड, फॉन्ट तसेच देवनागरी-मोडी-देवनागरी वेबकन्व्हर्टर प्लग-इन बनविले आहे.

**Centre for Development of Advanced Computing**
A Scientific Society of Ministry of Communications and Information Technology, Government of India
GIST Group, 5th Floor, CDAC Innovation Park, Panchvati, Pashan, Pune - 411 008.
Tel: +91-20-25503475 / 406, Email: info.gist@cdac.in
www.cdac.in

# मोडी - शाहु फॉंट

छत्रपती शाहु आणि पेशव्यांच्या काळखंडातील दस्तावेजावर मोडी- शाहु फॉंट बनविला गेला आहे. या फॉंटचे वैशिष्ठ्य म्हणजे याद्वारे आपल्यास 'र' आपल्यास तीन प्रकारे काढता येतो.




## मोडी फॉन्ट, टायपिंग टूल आणि इनस्क्रीप्ट कीबोर्ड

मोडी फॉन्ट आणी की-बोर्डचे वैशिष्ठ्य म्हणजे याच्या साह्याने 'र' या शब्दाचे वेगवेगळे तीन स्वरूपात आपल्याला लिखाण करता येत उदा: खाली 'र' हा वेगवेगळ्या तीन प्रकारे लिहिला आहे. शब्दाच्या रचनेनुसार वापरकर्त्यास की-बोर्डच्या साह्याने 'र' काढता येतो.










**Centre for Development of Advanced Computing**
A Scientific Society of Ministry of Communications and Information Technology, Government of India
GIST Group, 5th Floor, CDAC Innovation Park, Panchvati, Pashan, Pune - 411 008.
Tel: +91-20-25503475 / 406, Email: info.gist@cdac.in
www.cdac.in

# मोडी लर्निंग ॲपची वैशिष्ट्ये

मोडी अक्षरांची ओळख | मोडी शिकण्यासाठी गेमची सुविधा | मोडी लिपीचा सराव करण्याची सुविधा | कालगणना | वार | संवत्सरे यांची माहिती | संक्षिप्त शब्द | संकेत | जोडाक्षरे | मोजणी पध्दत | रेघी पध्दत आदिचा समावेश | हस्ताक्षर | पत्रे तसेच  मुद्रांचे नमुने | अँड्राईड 4.4 आणि वरच्या सिस्टिमवर सपोर्ट | मोजी लर्निंग ॲप गुगल प्ले-स्टोअरच्या खालील लिंकवर डाऊनलोडसाठी उपलब्ध आहे.
























## देवनागरी-मोडी-देवनागरी वेबकन्व्हर्टर प्लग-इन

या प्लग-इन द्वारे वेबसाईटवरील युनिकोड देवनागरी डेटा मोडी लिपीमध्ये तसेच मोडीमधुन परत देवनागरीमध्ये बदलता येतो. याद्वारे देवनागरी वेबसाईट मोडीमधुनही वाचता येते. मोडी लिपीच्या प्रसारासाठी वापरकर्त्यांना या प्लग-इनचा वापर करता येईल. याची वैशिष्ठ्ये पुढीलप्रमाणे आहेत.

क्रोम ब्राउझरवर सपोर्ट | विंडोंज आणि मॅक सिस्टिमसाठी उपयोगी | वेबडेव्हलपर्ससाठी फ्री-कोड | स्नीपेट खालील लिंकवर उपलब्ध आहे.











## मोडी - देवनागरी टेक्स्ट शेअरींग ॲप

या ॲपद्वारे मोडी तसेच देवनागरी लिपीमधील टेक्स्ट इमेज, सोशल मिडीयावर तसेच मेलवर पाठविता येते










